ठाणे, सोमवार दि. ९ सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १३३ , पाने : ६, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**भाजपाची कळत नकळत घराणेशाही**

काँग्रेसच्या घराणेशाहीवर कायम नाके मुरडणाऱ्या आणि टीका करणाऱ्या भारतीय जनता पक्षाने हरियाणा विधानसभेसाठी घराणेशाहीची पार्श्वभूमी असलेल्या अनेकांना ........पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३६° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७३,२८० | ९३,६८० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



स्वच्छता अभियान सुरु आहे हे मान्य आमच्या वॉर्डमधील कचरा हटवू नका, इथे बिल्डिंग बांधावी म्हणतोय

## गणरायाचा मनोभावे पाहुणचार करून निरोप....



गणपती बाप्पा मोरया पुढल्या वर्षी लवकर या असा जयघोष करत दीड दिवसाच्या लाडक्या गणरायला गणेश भक्तांनी मनोभावे पाहुणचार करून निरोप दिला. ठाण्यातील रायलादेवी तलाव येथील कृत्रिम तलावात गणेश मूर्ती विसर्जन करण्यात आल्या..... (छाया – मनोज सिंह)

## ‘वर्षा’ निवासस्थानी श्री गणरायाची प्रतिष्ठापना

मुंबई,:–गणेशोत्सवानिमित्त ‘वर्षा’ या शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक श्री गणरायाची विधिवत पूजा करुन प्रतिष्ठापना केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला सुख समृद्धी मिळू दे अशी प्रार्थना केली.दरवर्षीप्रमाणे यंदाही मुख्यमंत्र्यांच्या ‘वर्षा’ निवासस्थानी गणरायाचे आगमन झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, त्यांच्या पत्नी सौ. लता शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, स्नुषा सौ. वृषाली शिंदे, नातू कु. रुद्रांश यावेळी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की, गणरायाचं आगमन झालंय. आपल्या आयुष्यात पण आनंद, समाधान, समृद्धी येवो, सर्वांना सुबुद्धी मिळो हीच प्रार्थना. प्रत्येक गणोशोत्सव एक नवी ऊर्जा, प्रेरणा आणि उत्साह घेऊन येतो. (पान २ वर)



राज्यातील जनतेला सुख, समृद्धी मिळू दे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे गणरायाला साकडे

विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय

## ९० दिवसांसाठी हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करण्यास केंद्राची मान्यता

**सोयाबीनला 4,892/- रुपयांचा हमी भाव मिळणार**



■ कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या पाठपुराव्याला यश

परळी वैद्यनाथ, बीड : महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे (उ्हरपरपक्षरू चींपवश) यांनी केंद्र सरकारकडे मागील काही दिवसांपासून केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांमध्ये ९० दिवसांसाठी किमान हमीभावाने सोयाबीन (डूेलशरप) खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयाने धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार समर्थन मूल्य योजनेच्या अंतर्गत सोयाबीन आणि उडीद ही दोन पिके ९० दिवसांसाठी हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान हे राज्य कृषी महोत्सवाच्या निमित्ताने परळीत आले होते. तेव्हा धनंजय मुंडे यांनी याबाबत मागणी केली होती, तसेच दिल्ली येथे भेटूनही याबाबत पाठपुरावा केला होता. अखेर या मागणीला मान्यता मिळाली आहे.

**केंद्र सरकारकडे सातत्याने पत्र व्यवहार आणि पाठपुरावा– धनंजय मुंडे**

राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत व्हावी आणि त्यांचे बाजारभाव पडल्याने नुकसान होऊ नये, या दृष्टीने हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात यावी, (पान २ वर)

### सोयाबीनला किमान ४८९२ प्रतिक्विंटलचा हमीभाव, केंद्र सरकारची घोषणा

केंद्र सरकारने महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांमध्ये सोयाबीनची किमान आधारभूत किंमत ही ४ हजार ८९२ रुपये प्रति क्विंटल इतकी निश्चित केली असून, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांसह वेळोवेळी पाठपुरावा केला. सोबतच या मागणीला समर्थन देणारे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे देखील मंत्री मुंडे यांनी यावेळी आभार व्यक्त केलेत.

## माझ्या सरकारनं 600 निर्णय घेतले

# पण लाडकी बहीण योजनेखाली बाकीच्या योजना दबून गेल्या





ह.भ.प.मारुती महाराज कुरेकर यांना ९३ व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त शांतीब्रह्म पुरस्कार आणि ह.भ.प.रामराव महाराज ढोक यांना ७० व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त तुलसीदास पुरस्कार प्रदान करण्यात आला.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी आळंदी येथील कार्यक्रमात वारकऱ्यांना संबोधित केले. माझ्या आयुष्यातील आजचा कार्यक्रम हा सर्वात आगळा–वेगळा आहे. वारकऱ्यांमध्ये येण्याचं भाग्य लाभतं, याहून दुसरं पुण्य काहीचं नाही. आज गुरू–शिष्यांचा वाढदिवस आहे, यापेक्षा मोठं काय असू शकतं. खरं म्हणजे आम्ही मुख्यमंत्री असलो किंवा सरकार असलो तरी राजकीय अधिष्ठानापेक्षा तुमचं स्थान नक्कीच मोठं आहे. राजकीय मंडळी ही आपल्या समोर नतमस्तक होतात. कारण वारकरी एक फॅक्टरी आहे, जिथं समाज तयार केला जातो. म्हणूनचं आनंद दिघे नेहमी वारकरी संप्रदाय समूहात मला घेऊन यायचे, अशी आठवण मुख्यमंत्र्यांनी सांगितली.

### ■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी व्यक्त केली खंत



पुणे: गेल्या काही दिवसांमध्ये राज्यात सुरू असलेल्या योजनांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलीच जुंपली आहे, यावर आज बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (एज्ञपरींह डहळपवश) म्हणाले, हे सरकार सामान्यांचं आहे, शेतकऱ्यांचं, कष्टकरांचं आहे हे सर्वांचं हे सरकार आहे, गेल्या दोन वर्षांत आम्ही सहाशे निर्णय घेतले. अनेक छोटे मोठे निर्णय घेतले. यावेळी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना देखील जाहीर केली. मात्र, अनेक निर्णय हे लाडकी बहीण योजनेखाली दबून गेलेत. शिंदेंच्या या वक्तव्यनंतर उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. एका दिवसात कोणतीही योजना सुरू होत नाही. एका महिन्यात तयार होत नाही. तर त्याचा बऱ्याच गोष्टीची तयारी करावी लागते, त्यासाठी खूप काळ लागतो, असं मुख्यमंत्री म्हणालेत.

या योजनेतून मिळणाऱ्या पैशावर कोणी काहीही बोललं, दीड हजारात विकत घेता का, लाच देता का? असे अनेक प्रश्न विचारले, मात्रमी इतकंच सांगतो सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्माला येणाऱ्या आणि पैशांच्या राशीत लोळणाऱ्यांना दीड हजारांची किंमत काय कळणार असं म्हणत शिंदेंनी विरोधकांना टोला लगावला आहे. शांतीब्रह्म ह. भ. प. मारोती महाराज कुरेकर बाबा यांचा ९३ वा अभिष्टचिंतन सोहळा आळंदीत पार पडत आहे. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते. लाडकी बहिणीला आपण एसटीचे पन्नास टक्के तिकीट केलं, त्यामुळं बहीण भावजींना म्हणते आता तुम्ही घरीच बसा, मी बाजार करून येते. हा निर्णय घेताना एसटी तोट्यात येईल, असं बोललं गेलं. पण मी म्हणालो बघा तरी काय होतं ते, पण आज हीच एसटी फायद्यात आली आहे. यावेळी लाडकी बहीण योजनेवर आरोप करणाऱ्यांना एसटी पन्नास तिकीट योजनेद्वारे एकनाथ शिंदेंनी उत्तर दिलं आहे.

शेतकऱ्यांनी गारपिट, अवकाळी पाऊस यामुळे पिकांचं नुकसान झालं त्या शेतकऱ्यांना १६ हजाक कोटी रूपये नुकसान भरपाई दिली, शेतकऱ्यांना केंद्राकडून ६ हजार मिळतात, त्यांना राज्य सरकारकडून ६ हजार आमच्या शेतकऱ्यांना दिले जातात, अशी माहिती शिंदेंनी यावेळी दिली. त्याचबरोबर इतर योजनांबद्दल देखील शिंदेंनी यावेळी बोलताना सांगितलं आहे. (पान २ वर)

**थोडक्यात घडामोडी**

### वागळेंत कंपनीच्या डिझेल बॅरलला आग

ठाणे – ठाण्याच्या वागळे इस्टेट परिसरातील रोड नं २२ येथील मे. मोतीलाल डिश अँड वर्क प्रा. लि. कंपनीत ग्राइंडिंगचे काम सुरु असताना डिझेलच्या बॅरलला आग लागली. सदरची घटना शनिवारी मध्यरात्री १२–१५ वाजण्याच्या सुमारास घडली. या आगीच्या घटनेत कुणीही जखमी झाले नसल्याची माहिती पालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली. ठाण्याच्या वागळे इस्टेट परिसरातील मे. मोतीलाल डिश अँड वर्क प्रा. लि. टोयाटो शोरूम च्या बाजूला, स्टेटस बँक इंडियाच्या जवळ, रोड क्रमांक २२, वागळे इस्टेट, या कंपनीमध्ये ग्राइंडिंग चे काम सुरू असताना बाजूला असलेल्या डिझेलच्या बॅरलला आग लागली होती. घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, अग्निशमन दल, आणि महावितरण कर्मचारी यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. सादर आगीत जीवितहानी नाही तर वित्तीयहानी झालेली आहे. आगीत विद्युत वायरिंग, विद्युत मोटार, प्लास्टिक पत्रे व इतर साहित्य जाळून खाक झाले. आग लागली तेव्हा कंपनीमध्ये पाच कामगार हे ग्राइंडिंगचे काम करीत होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी अवघ्या २० मिनटात आग पूर्णपणे विझविली.

### मुंब्र्यात अज्ञात चोरट्याची २.८३ लाखाची बंद घरावर हातसफाई

ठाणे – कामावर घराला काडी कुलूप लावून गेलेल्या तक्रारदार विनय विम्लशंकर दुबे(४८) यांच्या बंद घराचा काडी कोयंडा उचकटून अज्ञात चोरट्याने घरावर हातसफाई करीत घरातील २ लाख ८३ हजार रुपयांचा मुद्देमाल घेऊन (पान २ वर)

## सेंट्रल जीएसटी अधीक्षकासह दोघांना अटक




सीबीआयची मुंबईत मोठी कारवाई!

मुंबई – केंद्रीय अन्वेषण विभागाने मुंबईमध्ये मोठी कारवाई केली आहे. सीबीआयने मुंबईमध्ये सीजीएसटीच्या लाचखोर अधीक्षकासह आणखी दोघांच्या मुसक्या आवळल्या आहेत. ६० लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी ही मोठी कारवाई करण्यात आली आहे. सीबीआयच्या या मोठ्या कारवाईने सर्वत्र खळबळ उडाली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, केंद्रीय अन्वेषण विभागाच्या टीमने मुंबईमध्ये मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत सीबीआयने सीजीएसटी (अँटी इव्हेशन) अधीक्षकासह ३ आरोपींना (पान २ वर)

# कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये आता कंत्राटी शिक्षक नेमणार

**पुणे : राज्यातील जिल्हा परिषदांच्या २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळेवर दोन शिक्षकांपैकी एका जागेवर सेवानिवृत्त शिक्षक नियुक्त करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने या पूर्वीच घेतला आहे. मात्र, सेवानिवृत्त शिक्षक न मिळाल्यास पद रिक्त राहून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. त्यामुळे आता २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये डी.एड., बी.एड. झालेल्या उमेदवारांची १५ हजार रुपये मासिक मानधनावर कंत्राटी शिक्षक म्हणून नियुक्ती करण्याचा नवा निर्णय घेण्यात आला असून, या निर्णयावरून आता नव्या वादाला तोंड फुटण्याची चिन्हे आहेत.**

राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. पवित्र प्रणालीमार्फत भरतीप्रक्रियेतून नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी निवृत्त शिक्षकांच्या नियुक्तीचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला होता. या निर्णयावरही टीका झाली होती. या पार्श्वभूमीवर आता शिक्षण विभागाने नवा निर्णय घेतला आहे. त्यानुसार कमी पटसंख्येच्या सर्वच शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षक उपलब्ध होतील असे नाही. त्यामुळे पद रिक्त राहून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. राज्यात डी.



एड., बी.एड. झालेले पात्रताधारक बेरोजगार उमेदवार मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांना कमी पटसंख्येच्या शाळांवर संधी दिल्यास शिक्षकांची पदे रिक्त न राहता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, असे शिक्षण विभागाने निर्णयात नमूद केले आहे. विशेष म्हणजे, शिक्षक दिनीच कंत्राटी शिक्षक नियुक्तीचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या २० किंवा २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या दोन पदांपैकी एका पदावर सेवानिवृत्त शिक्षक किंवा डी.एड. बी.एड. पात्रताधारक बेरोजगार उमेदवारांची नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. सेवानिवृत्त शिक्षकांसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्षे आहे. सेवानिवृत्त शिक्षक शारीरिक, मानसिक आणि आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. त्याच्या विरुद्ध कोणत्याही प्रकारची चौकशी प्रलंबित नसावी. सुरुवातीला नियुक्तीचा कालावधी एक वर्ष राहील. त्यानंतर गुणवत्ता आणि योग्यतेच्या आधारावर आवश्यकतेनुसार कालावधी जास्तीत जास्त तीन वर्षांसाठी किंवा वयाच्या ७० वर्षांपर्यंत जे आधी घडेल तो राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

डी.एड., बी.एड. पात्रताधारक बेरोजगार उमेदवारांना शासन नियमानुसार कमाल आणि किमान वयोमर्यादा लागू राहील. कोणत्याही लाभाव्यतिरिक्त मानधन दरमहा १५ हजार रुपये असेल. तसेच एकूण १२ रजा लागू असतील. सुरुवातीला नियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा असेल. त्यानंतर गुणवत्ता आणि योग्यतेच्या आधारावर आवश्यकतेनुसार नियुक्तीचे दरवर्षी नूतनीकरण करण्यात येईल. नियुक्तीसाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्यांशी करारनामा करावा लागेल. नियुक्तीच्या कालावधीत शिक्षकीय पदाची कामे करावी लागतील. कंत्राटी शिक्षकाचे काम समाधानकारक नसल्याचे मूल्यमापनात निदर्शनास आल्यास सेवा समाप्त करण्यात येईल. शाळेची पटसंख्या २० पेक्षा जास्त झाल्यास कंत्राटी तत्त्वावरील सेवानिवृत्त शिक्षक, डीएड., बीएड. पात्रताधारक यांची सेवा नियमित शिक्षकांची नियुक्ती होईपर्यंत सुरू राहील. कंत्राटी शिक्षकांवर केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे नियंत्रण असेल, असे नमूद करण्यात आले आहे.

### बदलीबाबत सूचना

२० किंवा त्यापेक्षा कमी पटसंख्येच्या जिल्हा परिषद शाळेत दोन नियमित शिक्षकांपैकी एका शिक्षकाची बदली जास्त पटसंख्या असलेल्या शाळेत समुपदेशनाने करावी. दोन्ही शिक्षकांची इच्छुकता घेऊन दोन्ही शिक्षक बदलीने जाण्यास इच्छुक असल्यास सेवाज्येष्ठ शिक्षकाला प्राधान्य द्यावे. दोन्ही शिक्षक बदलीने जाण्यास इच्छुक नसल्यास कनिष्ठ शिक्षकाची बदली करावी, असे स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, पात्रताधारक बेरोजगार नियमित भरतीच्या प्रतीक्षेत आहेत. असे असताना, राज्यातील शाळांमध्ये कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती करण्याचा निर्णय चुकीचा आहे. या निर्णयाला विरोध आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी नियमित शिक्षकांचीच नियुक्ती झाली पाहिजे, असे डीटीएड, बीएड स्टुडंट्स असोसिएशनचे अध्यक्ष संतोष मगर यांनी सांगितले.

# संपादकीय...





संपादक–चंद्रकांत भोईटे

## भाजपाची कळत नकळत घराणेशाही

कॉंग्रेसच्या घराणेशाहीवर कायम नाके मुरडणाऱ्या आणि टीका करणाऱ्या भारतीय जनता पक्षाने हरियाणा विधानसभेसाठी घराणेशाहीची पार्श्वभूमी असलेल्या अनेकांना उमेदवारी दिली आहे. दुसऱ्या सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण अशी अवस्था भाजपाची झालेली दिसते. हरियाणा आणि जम्मू काश्मीर विधानसभेच्या निवडणुका सध्या सुरु आहेत. या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष, कॉंग्रेससह आदी राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. आपल्याच पक्षाच्या जास्त जागा कशा निवडून येतील? यासाठी सध्या राजकीय रणनीती आखली जात असून सध्या प्रचारालाही सुरुवात झाली आहे. हरियाणामध्ये विधानसभेसाठी ५ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने हरियाणा विधानसभेसाठी ६७ उमेदवारांच्या नावांची पहिली यादी जाहीर केली आहे. या यादीत भाजपाने जातीय समीकरण साधण्याचा प्रयत्न केल्याचे म्हटले जात आहे. मात्र, तरीही हरियाणातील भाजपाच्या काही नेत्यांमध्ये नाराजी असल्याचे बोलले जात आहे. कॉंग्रेसवर नेहमी घराणेशाहीची टीका करणाऱ्या भारतीय जनता पक्षाने हरियाणा विधानसभेसाठी घराणेशाहीची पार्श्वभूमी असलेल्या अनेकांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे भाजपाचा घराणेशाहीचा विरोध कुठे गेला? असा सवाल राजकीय वर्तुळात अनेकांनी उपस्थित केला आहे. भाजपाने जाहीर केलेल्या ६७ उमेदवारांच्या पहिल्या यादीत विविध राजकीय घराण्यांशी संबंधित अनेक चेहरे आहेत. यामध्ये कमीत कमी आठ राजकीय घराणेशाही पार्श्वभूमी असलेल्या नेत्यांना निवडणुकीचे तिकीट दिले आहे. त्यातील बहुतांश नेते कॉंग्रेसच्या संबंधित आहेत. यामध्ये जेष्ठ नेते विनोद शर्मा यांच्या पत्नी आणि राज्यसभा खासदार कार्तिकेय शर्मा यांच्या आई शक्ती राणी शर्मा यांना कालका मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. तसेच माजी आमदार कर्तारसिंग भडाना यांचे पुत्र मनमोहन भडाना यांना समलखा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. १९९९ मध्ये राज्यात इंडियन नॅशनल लोक दल सरकार स्थापन करण्यात भडाना यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. ज्यावेळी आमदारांच्या एका गटाने हरियाणा विकास पार्टीमधून वेगळी भूमिका घेतली होती. त्यावेळी देवीलाल यांचा मुलगा ओम प्रकाश चौटाला यांना पाठिंबा दिला होता. त्यानंतर ते मुख्यमंत्री बनले होते. पुढे २०१२ मध्ये कर्तारसिंग भडाना यांनी राष्ट्रीय लोक दलाच्या तिकिटावर पोटनिवडणूक जिंकली होती. आता काही महिन्यांपूर्वीच कर्तारसिंग भडाना यांनी अचानकपणे भाजपामध्ये प्रवेश केला आहे. भाजपा निवडणुकीत विजयी होण्याच्या दृष्टीने घराणेशाही राबवू लागला आहे असे दिसते.


याबरोबरच केंद्रीय मंत्री राव इंद्रजित सिंह यांची मुलगी आरती राव यांना अटेली मतदारसंघातून भाजपाने तिकीट दिले आहे. ज्येष्ठ नेते राव इंद्रजित सिंह यांनीही दशकभरापूर्वी कॉंग्रेस सोडून भाजपामध्ये प्रवेश केला होता. आता भाजपाच्या या यादीत आणखी एक नेता म्हणजे ज्येष्ठ नेते किरण चौधरी यांची मुलगी श्रुती चौधरी ज्यांनी जून २०२४ मध्ये कॉंग्रेस सोडून भाजपामध्ये प्रवेश केला. आता श्रुती चौधरी यांनाही भाजपाने तोशाममधून उमेदवारी दिली आहे. तसेच कुलदीप बिश्नोई यांचा मुलगा भव्य बिश्नोई याला आदमपूरमधून उमेदवारी देण्यात आली आहे. अशाप्रकारे भाजपाचे घरणेशाहीला कवटाळणे सुरू आहे. हरियाणाचे माजी मुख्यमंत्री भजनलाल यांचा मुलगा कुलदीप बिश्नोई यांनी २००७ मध्ये कॉंग्रेसमधून हकालपट्टी केल्यानंतर हरियाणा जनहित पक्षाची स्थापना केली होती. त्यानंतर कुलदीप बिश्नोई यांनी २०११ ते २०१४ या दरम्यान भाजपाबरोबर युती केली होती. पुढे २०१६ मध्ये त्यांचा पक्ष कॉंग्रेसमध्ये विलीन केला. यानंतर २०२२ मध्ये कुलदीप बिश्नोई यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. आयएनएलडीचे माजी आमदार हरिचंद मिड्ढा यांचे पुत्र कृष्णा मिड्ढा यांना पुन्हा जिंदमधून उमेदवारी देण्यात आली आहे. २०१९ मध्येही कृष्णा मिड्ढा हे जिंद मतदारसंघातून जिंकले होते आणि भाजपाने पहिल्यांदाच ही जागा जिंकली होती. दरम्यान, भोंडसी कारागृह अधीक्षक सुनील सांगवान यांच्या कार्यकाळात डेरा सच्चा सौदा प्रमुख राम रहीमला अनेकदा पॅरोल मंजूर करण्यात आला होता. आता त्यांना चरखी दादरी या मतदारसंघातून सुनील सांगवान यांना मैदानात उतरवण्यात आलं आहे. ते माजी खासदार सतपाल सांगवान यांचे पुत्र असून त्यांनी काही दिवसांपूर्वीच कॉंग्रेस सोडून भाजपामध्ये प्रवेश केला आहे. तसेच भाजपाकडून राव नरबीर सिंग यांना बादशाहपूर मतदारसंघातून तिकीट देण्यात आलं आहे. ते हरियाणाचे माजी मंत्री राव महावीर सिंह यादव यांचे पुत्र आणि पंजाबचे दिवंगत आमदार मोहर सिंह यादव यांचे नातू आहेत. भाजपा एकीकडे कॉंग्रेसवर घराणेशाही राबवल्याची टीका करीत असताना दुसरीकडे भाजपाचा घराणेशाहीचा कार्यक्रम जोमात सुरू आहे असे दिसते. जी तत्व घेऊन भाजपा राजकारणात उतरला आहे, ते पाहता भाजपा आपल्याच राजकीय तत्वांशी बेईमानगिरी करत असल्याचे दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी लाल किल्ल्यावरून स्वातंत्र्यदिनी कॉंग्रेसच्या घराणेशाहीवर भाषण ठोकतात. परंतु स्वतःच्या पक्षात काय गैर सुरू आहे ते त्यांच्या लक्षात येत नाही की हेतुपुरस्सर याकडे डोळेझाक करतात ? हे कोडे उलगडत नाही. अशा प्रकारे कळत नकळत भाजपाने घराणेशाहीला कवटाळले आहे असे दिसते.







■ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार संजय केळकर, खासदार नरेश म्हस्के, प्रवीण दरेकर यांनी आमदार निरंजन डावखरे यांच्या निवासस्थानी गणेश दर्शनासाठी आले असतानाची काही क्षणचित्रे....





■ आमदार निरंजन डावखरे यांच्या घरातील गणपती बाप्पा चे वाजत गाजत ढोल ताशाच्या गजरात रोल्स रॉयस गाडीतून विसर्जन मिरवणूक....






■ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच मिरभाईंदरचे पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी आमदार निरंजन डावखरे यांच्या निवासस्थानी भेट देऊन श्री गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले व मित्र परिवार आदींची उपस्थिती....

## ■ शिंदेंचा विधानसभेसाठी मेगा प्लॅन

# ४३ लाख लाडक्या बहिणीपर्यंत पोहोचण्याचं नियोजन

**पत्रही लिहिणार**

**मुंबई : राज्याची विधानसभा निवडणूक अगदी तोंडावर असताना आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून मोठा प्लॅन आखण्यात आला आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतलेल्या राज्यातील ४२.८० लाख महिलांपर्यंत थेट पोहोचण्याचं नियोजन शिवसेनेकडून करण्यात आलं आहे. त्यासाठी सोमवारी वर्षा बंगल्यावर शिवसेनेचे आमदार आणि जिल्हाप्रमुखांसोबत मुख्यमंत्री चर्चा करणार आहे.**

महायुती सरकारची एक महत्वाकांक्षी योजना म्हणून लाडकी बहीण योजनेकडे पाहिलं जातंय. या योजनेचा आपल्याला जास्तीत जास्त राजकीय फायदा व्हावा यासाठी महायुतीतील सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. शिवसेनेने त्यासाठी एक मेगा प्लॅन तयार केला असून त्या माध्यमातून सर्व महिलांपर्यंत पोहोचण्याचं नियोजन करण्यात आलं आहे.

### प्रत्येक महिलेपर्यंत पोहोचण्याच्या सूचना

राज्यातील जे विधानसभा मतदारसंघ शिवसेनेला अपेक्षित आहेत, पक्षाच्या वाट्याला येण्याची शक्यता आहे अशा मतदारसंघांवर लक्ष केंद्रीत करण्याचं धोरण आहे. अशा मतदारसंघातील ४२ लाख ८० हजार महिलांपर्यंत शिवसैनिकांनी पोहोचण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक शिवसैनिकाने या महिलांपर्यत पोहोचावं असे निर्देश आहेत. त्याचसोबत स्वतः मुख्यमंत्र्यांनी लिहिलेला मजकूर असलेले पत्रही या महिलांना देण्यात येणार आहे. त्या माध्यमातून थेट लोकांपर्यंत पोहोचण्याचा नवीन प्रयत्न शिवसेनेकडून करण्यात येत आहे.

### आमदार आणि जिल्हाप्रमुखांसोबत बैठक

येत्या विधानसभा निवडणुकीसाठी प्रत्येक घरापर्यंत, मतदारापर्यंत पोहोचण्याचा शिवसेनेचा प्रयत्न आहे. त्यासाठी स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे प्रत्येक आमदार आणि जिल्हाप्रमुखासोबत चर्चा करणार आहेत. जे लोक या बैठकीला हजर राहू शकत नाहीत त्यांच्यासोबत झूम मिटिंगच्या माध्यमातून चर्चा केली जाणार आहे.



### ■ लाडकी बहीण योजनेचा फायदा घेण्यासाठी महायुतीमध्ये चढाओढ

महायुती सरकारने सुरू केलेली लाडकी बहीण योजनेचा आगामी विधानसभेमध्ये फायदा घेण्यासाठी तीनही पक्षांनी कंबर कसल्याचं दिसतंय. राष्ट्रवादीच्या अजित पवारांनी या आधीच राज्यात जनसन्मान यात्रा सुरू केली आहे. त्या माध्यमातून अजित पवारांनी राज्यातील जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहोचण्याचा निश्चय केल्याचं दिसतंय. तर भाजपकडूनही या योजनेची जाहीरात केली जातेय. आता शिवसेनेनेही या योजनेच्या माध्यमातून राज्यातील महिला मतदारांपर्यंत पोहोचण्याचं नियोजन केल्याचं दिसतंय.

## गणेशोत्सवासाठी कोकणात येणाऱ्या गणेशभक्तांसाठी कशेडी घाटातील दुसरा बोगदाही खुला

खेड:- मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटाला पर्याय असणाऱ्या घाटातील दुसरा बोगदा वाहतुकीस कोकणात येणाऱ्या वाहनांसाठी सुरू करण्यात आला. त्यामुळे महामार्गावर वाढलेल्या वाहतुकीला थोडा दिलासा मिळाला आहे.

गतवर्षी गणेशोत्सव कालावधीत एका बोगद्यातून हलकी प्रवासी वाहने सोडण्यात आली होती. मात्र, त्यानंतर पुन्हा येथील वाहतूक बंद करण्यात आली. बोगद्याचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे, यासाठी वाहतूक बंद ठेवून काम वेगाने सुरू होते. शिमगोत्सवादरम्यान २५ फेब्रुवारीपासून कशेडी बोगद्यातून कोकणात येणाऱ्या लहान वाहनांना वाहतूक करण्यास परवानगी देण्यात आली.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक आरोग्य विभाग

ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यकमाकरीता टी.बी. रुग्णांच्या तपासणीकरीता लागणारे Falcon Tube पुरवठा करणेसाठी ऑनलाईन ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in दि.९/०९/२०२४ ते १८/०९/२०२४ पर्यंत संध्याकाळी १६:०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.दि.१८/०९/२०२४ रोजी संध्याकाळी १६:३० वाजेपर्यंत ऑनलाइन निविदा स्विकारण्यात येतील. दि. १९/०९/२०२४ रोजी संध्याकाळी १६:०० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/४५१/२०२४-२५
दि: ०६.०९.२०२४
**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

**सही/-**
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
ठाणे महानगरपालिका ,ठाणे

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

"पायाभुत सुविधांसाठी विशेष अनुदान (शासकीय जमिनींवरील अतिक्रमण रोखण्यासाठी अशा जागांभोवती संरक्षक भिंत बांधणकाम करणे" योजने अंतर्गत "कळवा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र. २५ (सर्व्हे क्र. १७९) मधील घोलाईनगर येथील शाळा क्र. ४ व ६ करीता आरक्षित शासकीय भूखंडाला संरक्षण भिंत बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे" या १ (एका) कामांकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिक ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावीत आहे. अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दि.९.९.२०२४ ते दि.१७.९.२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा दि.१७.९.२०२४ रोजी पर्यंत १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दि.१८.९.२०२४ रोजी पर्यंत १६.३० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ सा.बा/४५५/२०२४-२५
दि: ०६.०९.२०२४
**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

**सही/-**
नगर अभियंता
ठाणेमहानगरपालिका, ठाणे

**नवी मुंबई महानगरपालिका**

**सार्व.आरोग्य अभियांत्रिकी विभाग**

**निविदा सूचना क्र.नमुंमपा/कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा)/14/2024**

**कामाचे नाव:-** घणसोली विभागामध्ये झोपडपटटी व गावठाण क्षेत्रामध्ये गणेश विसर्जनासाठी पाण्याच्या टँकरव्दारे नैसर्गिक तलावामधुन पाणी भरून प्रस्तावित कृत्रिम (Eco friendly) तलावामध्ये पाणी पुरवठा करणे.

**अंदाजपत्रकीय रक्कम (रु.).:- 4,97,718/-**

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर या संकेतस्थळावर दि. 09 /09/2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. Online निविदा सादरीकरणाच्या प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे**

सही/-
**कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/353/2024

## ९० दिवसांसाठी हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास केंद्राची मान्यता

**(पान १ वरून)** त्याचबरोबर सोया मिल्क, खाद्यतेल, सोया केक इत्यादी उत्पादने आयात करण्यावर शुल्क लावावे. तसेच सोयाबीन निर्यातीसाठी प्रतिक्विंटल किमान ५० डॉलर अनुदान द्यावे, याबाबत मी केंद्र सरकारकडे सातत्याने पत्र व्यवहार आणि पाठपुरावा केला. यासंदर्भात केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याशी देखील वारंवार संपर्कात होतो. केंद्र सरकारने ९० दिवसांकरिता हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिल्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अधिकचा आर्थिक लाभ मिळणार असल्याचा मला मनापासून आनंद होतो आहे, अशा भावना कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केल्या आहेत.

मागील वर्षी सोयाबीन चे भाव पडल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले होते. मात्र त्याही परिस्थितीत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा करून राज्य शासनाच्या वतीने सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी पाच हजार रुपये आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला. यासाठी राज्य सरकारने ४२०० कोटी रुपये अनुदान उपलब्ध करून दिले असून येत्या दोन-तीन दिवसात या अनुदानाचे थेट वितरण शेतकऱ्यांच्या खात्यावरती करण्यात येणार आहे.

## पण लाडकी बहीण योजनेखाली बाकीच्या योजना दबून गेल्या

**(पान १ वरून)** योजनांवर विरोधकांनी केलेल्या टीकेवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उत्तर देताना म्हणाले, एकनाथ शिंदे आयुष्यात कधी खोटं बोलला नाही, कधी ही फसवणार नाही. मात्र सरकारने आलेल्या योजना फसव्या असल्याच्या अफवा उठवल्या जातायेत. माझ्याकडे येणारा एक ही व्यक्ती खाली हाती जाणार नाही, एवढी मोठी शक्ती मला द्यावी असं मागणं मी परमेश्वराकडे करतो असंही ते यावेळी म्हणाले आहेत.

काश्मीरमध्ये जिथं तिरंगा फडकविण्याची हिंमत कोणी करत नव्हतं, आज त्याच ठिकाणी मराठी माणूस गणेशोत्सव साजरा करतोय. ही देशासाठी अभिमानाची बाब असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

## मुंब्र्यात अज्ञात चोरट्याची २.८३ लाखाची बंद घरावर हातसफाई

**(पान १ वरून)** पोबारा केला. गुरुवारी(ता-५ सप्टेंबर) रोजी सकाळी ९ ते ७ या कालावधीत चोरीची घटना घडली. तक्रारदार विनय विमलाशंकर दुबे(४८) रा.दिवा पूर्व यांचे राहते घराच्या मुख्य दरवाज्याची कडी-कोयंडा कोणीतरी अज्ञात चोरटयाने तोडून घरात आत प्रवेश करून कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा २ लाख ८३ हजाराचा मुद्देमाल घेऊन पोबारा केला. या प्रकरणी तक्रारदार यांनी मुंब्रा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात मुंब्रा पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

## सेंट्रल जीएसटी अधीक्षकासह दोघांना अटक

**(पान १ वरून)** आणि दोन खाजगी व्यक्तींना ६० लाख रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी अटक केली आहे. ६० लाखांपैकी २० लाखांची लाच घेतानाच रंगेहात पकडण्यात आले असून याप्रकरणात तब्बल सात अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सीजीएसटीकडे असलेल्या एका प्रकरणात कारवाई न करण्यासाठी तक्रारदाराकडून या अधिकाऱ्यांनी तब्बल ६० लाखांची मागणी केल्याचे तपासात समोर आले आहे. यामधील ३० लाख रुपये हवालामार्फत देण्यात आल्याचे सीबीआयने म्हटले आहे. या कारवाईमध्ये सीजीएसटीचे अतिरिक्त सह आयुक्त, सीजीएसटी आयुक्त, ४ अधीक्षक, २ सनदी लेखापालासह एका खासगी व्यक्तींचा सहभाग आहे. दरम्यान, या सर्वांना सीबीआयच्या विशेष न्यायालयाने १० सप्टेंबरपर्यंत कोठडी सुनावली आहे.

दुसरीकडे विरोधी पक्षनेते असताना देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विधीमंडळात सादर केलेल्या पेन ड्राईव्हवरुन सीबीआयने आता माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यासह सरकारी वकील प्रविण चव्हाण, पुण्यातील तत्कालीन पोलीस उपायुक्त पोर्णिमा गायकवाड निवृत्त सहायक पोलीस आयुक्त सुषमा चव्हाण विजय पाटील यांच्याविरुद्ध कट कारस्थान करण्याचा गुन्हा दाखल केला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय जनता पक्षांच्या नेत्यांना खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात असल्याचा आरोप केला होता. याच प्रकरणात ही कारवाई करण्यात आली आहे.

## 'वर्षा' निवासस्थानी श्री गणरायाची प्रतिष्ठापना

**(पान १ वरून)** सगळीकडे मंगलमय आणि पवित्र वातावरण निर्माण होतं. गणेशोत्सवातून महाराष्ट्राच्या महान संस्कृतीचं दर्शन घडतं. सगळ्या जगाचं महाराष्ट्राकडे लक्ष लागलेले असते. या काळात महाराष्ट्राच्याच नाही तर देशात आणि विदेशातही मराठी माणसांत उत्साह-जोश दिसतो.हे शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे सरकार आहे. यंदा राज्यात सगळीकडे खूप चांगला पाऊसही झाला आहे, त्यामुळं शेतकरी बांधवामध्येही उत्साह आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे शेतीभातीचं नुकसान झालं आहे. पण सरकार पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, बरोबर आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना सगळी मदत केली जाईल.

माझं आपणास आवाहन आहे. की, श्री गणेशाची मनोभावे सेवा करतानाच, आपण सामाजिक बांधिलकची जाणीव ठेवूया. गरजू लोकांपर्यंत पोहचा. त्यांना मदतीचा हात द्या. त्यांच्यापर्यंत शिक्षण, आरोग्य तसेच अशा विविध प्रकारच्या सेवा, मदत पोहचवण्याचा प्रय़त्न करूया. आपण पर्यावरणाची काळजी घेणं पण गरजेचं आहे. आपले सणवार हे निसर्गाला पूरक असे असतात. त्यामुळे निसर्गाचं जतन-संवर्धन होईल ही बाब लक्षात घेऊन सण साजरे करावेत असेही आवाहन यावेळी मुख्यमंत्र्यांनी केले.

राज्य शासनाने अनेक चांगल्या सामाजिक योजना सुरु केल्या आहेत, देशपातळीवर त्याचं कौतुक होतंय. शेतकरी युवक महिला सर्वच स्तरातील घटकांचा विचार करून शासन सगळ्यांना सक्षम करण्यासाठी पाठबळ देत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण सारखी योजना म्हणजे राज्यातल्या भगिनींच्या आयुष्यात क्रांती आणणारी योजना ठरत आहे. या बहिणींचे आशीर्वादही आम्हाला मिळत आहेत. परदेशी गुंतवणूक राज्यात मोठ्या प्रमाणावर येत आहे. देशाच्या पाच ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राचा एक ट्रिलियन डॉलर्सचा वाटा असणार आहे.

श्रीगणेशाच्या कृपेनं आम्ही राज्यातल्या गोरगरीब, दुर्बल आणि गरजू लोकांसाठी आणखीही चांगल्या योजना आणून त्यांची अंमलबजावणी करू असेही यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## भारतीय रेल्वे

### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/




■ पदाचे नाव :
१ डायटीशियन
२ नर्सिंग सुपरिटेंडेंट
३ ऑडिओलॉजिस्ट स्पीच थेरेपिस्ट
४ क्लिनिकल सायकोलॉजिस्ट
५ डेंटल हाइजीनिस्ट
६ डायलिसिस टेक्निशियन
७ हेल्थ मलेरिया इंस्पेक्टर ग्रेड III
८ लॅब सुपरिटेंडेंट ग्रेड III
९ पर्फ्युजनिस्ट
१० फिजियोथेरेपिस्ट ग्रेड II
११ ऑक्यूपेशनल थेरेपिस्ट
१२ कॅथ लॅब टेक्निशियन
१३ फार्मासिस्ट
१४ रेडिओग्राफर एक्स-रे टेक्निशियन
१५ स्पीच थेरपिस्ट
१६ कार्डियाक टेक्निशियन
१७ ऑप्टोमेट्रिस्ट
१८ ECG टेक्निशियन
१९ लॅब असिस्टंट ग्रेड II
२० फील्ड वर्कर
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: B.Sc + डायटीशियन PG डिप्लोमा किंवा B.Sc (Home Science) + M.Sc Home Science (Food and Nutrition)
पद क्र.२: GNM² किंवा B.Sc (Nursing)
पद क्र.३: B-SLP
पद क्र.४: पदव्युत्तर पदवी (Clinical Psychology / Social Psychology)
पद क्र.५: (i) B.Sc (Biology) (ii) डेंटल हाइजीन डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: B.Sc.+डिप्लोमा (Haemodialysis) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) B.Sc.(Chemistry) (ii) हेल्थ / सॅनिटरी इंस्पेक्टर डिप्लोमा किंवा NTC (Health Sanitary Inspector)
पद क्र.८: B.Sc (Bio-Chemistry / Micro Biology / Life science)+DMLT किंवा B.Sc (Medical Technology)
पद क्र.९: B.Sc + डिप्लोमा (Perfusion Technology) किंवा B.Sc + ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) फिजिओथेरेपी पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) १२वी उत्तीर्ण (ii) ऑक्यूपेशनल थेरेपी डिप्लोमा/पदवी
पद क्र.१२: B.Sc+ डिप्लोमा (Cardiac Professional Cath Lab work) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१३: १२वी उत्तीर्ण+D.Pharm किंवा B.Pharma
पद क्र.१४: १२वी उत्तीर्ण (PhysicsChemistry) (ii) डिप्लोमा (Radiography/ X Ray Technician/ Radiodiagnosis Technology)
पद क्र.१५: (i) B.Sc (ii) डिप्लोमा (Audio and Speech Therapy) (iii) २ वर्षे अनुभव
पद क्र.१६: १२वी (Science) उत्तीर्ण किंवा डिप्लोमा (Cardiology Lab)
पद क्र.१७: B.Sc (Optometry) किंवा (Ophthalmic Technician)
पद क्र.१८: (i) १२वी उत्तीर्ण /B.Sc (ii) डिप्लोमा/पदवी (ECG Laboratory Technology / Cardiology /Cardiology Technician / Cardiology Techniques )
पद क्र.१९: (i) १२वी उत्तीर्ण (ii) DMLT
पद क्र.२०: १२वी उत्तीर्ण (Biology/ Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१,४,५,७,८,१०, ११, १२, १५ ते १९: १८ ते ३६ वर्षे
पद क्र.२: २० ते ४३ वर्षे
पद क्र.३: २१ ते ३३ वर्षे
पद क्र.६: २० ते ३६ वर्षे
पद क्र.९: २१ ते ४३ वर्षे
पद क्र.१३: २० ते ३८ वर्षे
पद क्र.१४: १९ ते ३६ वर्षे
पद क्र.२०: १८ ते ३३ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST/ExSM²/ /EBC/महिला: २५०/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत संकेतस्थळ https://indianrailways.gov.in/

## भारतीय सर्वोच्च न्यायालय

■ जागा : ८० जागा
■ पदाचे नाव:
१ ज्युनियर कोर्ट अटेंडंट (स्वयंपाकाचे
■ शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) पाककला डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते २७ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: दिल्ली
■ Fee: General/OBC: ४००/- SC/ST/PWD/ExSM²: २००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १२ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.sci.gov.in/

## युनियन बँक ऑफ इंडिया

■ पद क्र. अप्रेंटिस
■ शैक्षणिक पात्रता: पदवीधर
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २० ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 800/- SC/ST: 600/-, PWD:400/-
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: १७ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल
■ अधिकृत वेबसाईट https://www.unionbankofindia.co.in/

## इंडियन ओव्हरसीज बँक

■ पद क्र.
अप्रेंटिस
■ पात्रता: कोणत्याही शाखेतील पदवी
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २० ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 944/- SC/ST: 708/-, PWD:472/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.iob.in/

## उत्तर रेल्वे

■ पदाचे नाव :
१ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी) ४०९६
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
■ वयाची अट: १६ सप्टेंबर २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: उत्तर रेल्वे
■ Fee: General/OBC: १००/- SC/ST/PWD/महिला: फी नाही
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://nr.indianrailways.gov.in/

### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

## ठाणे पालिकेत भरती

■ पद
वैद्यकीय अधिकारी
परिचारीका (महिला)
परिचारीका (पुरुष)
बहुउद्देशीय कर्मचारी
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: MBBS/BAMS
पद क्र.२: B.Sc (Nursing)
पद क्र.३: B.Sc (Nursing)
पद क्र.४: (i) १२वी (Science) उत्तीर्ण (ii) पॅरामेडिकल बेसिक ट्रेनिंग कोर्स किंवा सॅनिटरी इंस्पेक्टर कोर्स
■ वयाची अट:
पद क्र. १: १८ ते ७० वर्षे
पद क्र. २ ते ४: १८ ते ६५ वर्षे
■ नोकरी ठिकाण: ठाणे
■ Fee: फी नाही.
■ अर्ज सादर करण्याचे ठिकाण: ठाणे महानगरपालिका भवन, सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी पाचपाखाडी, ठाणे ४०० ६०२
महत्त्वाच्या तारखा:
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०७ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://thanecity.gov.in/tmc/CitizenHome.html

## भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकर

■ पद क्र.
असिस्टंट डायरेक्टर
असिस्टंट हायड्रोग्राफिक सर्व्हेअर
परवाना इंजिन ड्रायव्हर
ज्युनियर अकाउंट्स ऑफिसर
ड्रेज कंट्रोल ऑपरेटर
स्टोअर कीपर
मास्टर 2nd क्लास
स्टाफ कार ड्रायव्हर
मास्टर क्लास
मल्टी टास्किंग स्टाफ
टेक्निकल असिस्टंट (Civil/ Mechanical/ Marine Engineering/Naval Architect)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: इंजिनिअरिंग पदवी (Civil / Mechanical)
पद क्र.२: (i) सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण (ii) इंजिन ड्रायव्हर परवाना
पद क्र.४: B.Com + ०३ वर्षे अनुभव किंवा B.Com+Inter ICWA/ Inter CA.
पद क्र.५: (i) १०वी उत्तीर्ण +१० वर्षांसह अनुभवसह प्रथम श्रेणी चालक म्हणून योग्यतेचे प्रमाणपत्र किंवा मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा +०१ वर्षे अनुभव (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.६: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ०५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) मास्टर २पव क्लास प्रमाणपत्र (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.८: (i) १०वी उत्तीर्ण (ii) वाहन चालक परवाना (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) मास्टर ३ीव क्लास प्रमाणपत्र (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.१०: १०वी उत्तीर्ण
पद क्र.११: पदवी (Civil / Mechanical/ Marine Engineering /Naval Architecture) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Civil / Mechanical / Marine Engineering / Naval Architecture)+ ०३ वर्षे अनुभव
■ वयाची अट: १५ सप्टेंबर २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१, २, ७: ३५ वर्षांपर्यंत
पद क्र.३, ४, ५, ८, ९ ११: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.६: २५ वर्षांपर्यंत
पद क्र.१०: १८ ते २५ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 500/- SC/ST/EWS/ PWD:200/-
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ सप्टेंबर २०२४ (११:५९ PM)
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://iwai.nic.in/

## केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल

■ पद क्र.
कॉन्स्टेबल/फायर (पुरुष)
■ शैक्षणिक पात्रता: १२वी(विज्ञान) उत्तीर्ण
■ शारीरिक पात्रता: उंची: १७० सेमी, छाती: ८०-८५ सेमी
■ वयाची अट: ३० सप्टेंबर २०२४ रोजी १८ ते २३ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: १००/- SC/ST/ExSM :फी नाही
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४ (११:०० PM²)
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.cisf.gov.in

# इतर मागासवर्गीय उद्योजकांना सुवर्णसंधी

## शामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय महामंडळाच्या विविध कर्ज योजना

राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाने या महामंडळांची स्थापना केली आहे. समाजातील इतर मागासवर्गीयांच्या आर्थिक उन्नतीसाठी महामंडळामार्फत स्वयंरोजगाराच्या विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. छोटे व्यावसायिक स्वयंरोजगाराकरिता रु.१.०० लक्ष ची थेट कर्ज योजना (नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज नाही) व २०% बीज भांडवल योजना, तसेच ऑनलाईन योजनांमध्ये वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (रु.१०.०० लक्ष पर्यंत), गट कर्ज व्याज परतावा योजना (१०.०० लक्ष ते ५०.०० लक्ष पर्यंत) या योजनांचा समावेश आहे.

**थेट कर्ज योजना व २०% बीज भांडवल योजना या योजनांचे अर्ज ठाणे जिल्हा कार्यालयात स:शुल्क उपलब्ध आहेत – रु. १.०० लक्ष थेट कर्ज योजना :–** सिबिल क्रेडीट स्कोर किमान ५०० असलेल्या लाभार्थींना हे कर्ज महामंडळातर्फे दिले जाते. कर्ज परतफेडीचा कालावधी वर्ष आहे. अर्जदाराचे वयाची मर्यादा १८ ते ५५ वर्षे आहे. कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज आकारण्यात येणार नाही, मासिक हप्ता रु.२०८५/.

**२०% बीज भांडवल योजना :–** कर्जाची उच्चतम मर्यादा रु. ५.०० लक्ष पर्यंत. कर्ज परतफेडीचा कालावधी ५ वर्षे आहे. अर्जदाराचे वयाची मर्यादा १८ ते ५० वर्षे आहे. बँकेमार्फत लाभार्थींना ७५% कर्ज उपलब्ध केले जाते. यामध्ये लाभार्थींचा सहभाग ५% महामंडळाचा सहभाग २०% बँकेचा सहभाग ७५% महामंडळाच्या कर्ज रक्कमेवर व्याजाचा दर ६% असतो.

**या योजनांसाठी लागणारी सर्वसाधारण कागदपत्रे :–**
■ पासपोर्ट साईज २ फोटो, तहसिलदार/नायब तहसिलदार यांनी दिलेला उत्पत्ताचा मूळ दाखला (ग्रामीण व शहरी भागासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. १.०० लक्ष),
■ सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र (इ.मा.व.), दरपत्रक (कोटेशन),
■ प्रकल्प अहवाल,
■ आधारकार्ड,
■ पॅनकार्ड किंवा निवडणूक ओळखपत्र व शिधा पत्रिकेची झेरॉक्स,
■ सिबिल क्रेडीट रिपोर्ट थेट कर्ज योजनेकरिता (स्कोर किमान ५०० असावा),
■ स्थानिक स्वराज्य संस्थेचे (ग्रामपंचायत/नगरपालिका) व्यवसाय करण्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र,
■ डोमिसाईल किंवा रहिवासी दाखला,
■ आधारकार्ड लिंक केलेल्या पासबुकची झेरॉक्स,
■ वयाच्या पुराव्यासाठी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र / जन्मतारखेचा दाखला,
■ भाडेकरार किंवा संबंधित जागा मालकाचे संमतीपत्र व व्यवसायाच्या जागेचा ॲसेसमेंट उतारा इ. कागदपत्रे

### वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना

■ या योजनेच्या लाभाकरिता महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळाला भेट देवून ऑनलाईन अर्ज दाखल करता येईल.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (रु.१०.०० लक्ष पर्यंत) :- ही योजना संपूर्णपणे संगणीकृत आहे. या योजनेमध्ये बँकेने रु.१०.०० लाखापर्यंतच्या मर्यादित कर्ज मंजूर केलेल्या अर्जदाराने कर्जाचे हप्ते नियमित भरल्यानंतर व्याजाची रक्कम (१२ टक्के मर्यादित) अर्जदाराच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते.

या योजनेचा कालावधी ५ वर्ष असेल. या योजनेसाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० असावे, अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.८.०० लक्ष पर्यंत. (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार), कुटूंबातील एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराचे आधार संलग्न बँक खाते असणे अनिवार्य महामंडळाच्या www.msobcfdc.org (व्याज परतावा योजना पर्याय) या वेबपोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणीकृत सशर्त हेतूपत्र (Letter of Intent) दिले जाईल. अर्जदारास या आधारे बँकेकडून कर्ज मंजूर करुन घ्यावे लागेल.

**गट कर्ज व्याज परतावा योजना (रु.१०.०० लक्ष ते ५०.०० लक्ष पर्यंत) :–** इतर मागासवर्गीय प्रवर्गातील महामंडळाच्या निकषांनुसार विहीत केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेतील उमेदवारांच्या बचत गट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, कंपनी (कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत), LLP, FPO अशा शासन प्रमाणिकरण प्राप्त संस्थाना बँकेमार्फत स्वयंरोजगार उद्योग उभारणीकरिता कर्ज दिले जाईल, त्या कर्ज रक्कमेवरील व्याज परतावा हा बॅक प्रमाणीकरणानुसार महामंडळाकडून अदा केला जाईल, कौटुंबिक बार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ८.०० लक्ष पर्यंत असलेल्या उमेदवारांच्या गटास बँकेकडून रु.१०.०० लक्ष ते रु.५०.०० लाख पर्यंत मंजूर उद्योग उभारणीकरिता कर्ज उपलब्ध केले जाईल. गटातील सदस्यांचे वय १८ ते ४५ पर्यंत असावे. गटातील सर्व सदस्यांचा सिबिल क्रेडीट स्कोअर किमान ५०० इतका असवा.

**परत फेडीचा कालावधी :–** मंजूर कर्जावर ५ वर्षापर्यंत अथवा कर्ज कालावधी यापैकी जो कमी असेल तो कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर (जास्तीत जास्त १२ टक्के व्याज दराच्या आणि रु.१५.०० लाखाच्या मर्यादित) त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. महामंडळाच्या www.msobcfdc.org (व्याज परतावा योजना पर्याय) या वेबपोर्टलद्वारे गटाचा ऑनलाईन पध्दतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणीकृत सशर्त हेतूपत्र (Letter of Intent) दिले जाईल. गटास या आधारे मंजूर करून घ्यावे लागेल.

### महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (मा.वि.म.) लोकसंचालित साधन केंद्र (CMRC) या योजना राबविण्यात येते. योजनेचा उद्देश व स्वरूप :- इतर मागास प्रवर्गातील गरीब, होतकरु, परितक्त्या महिलांचे सक्षमिकरण करून त्यांना स्वावलंबी व आत्मनिर्भर करणे, राज्यातील महिला बचत गटातील इतर मागास प्रवर्गातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे उत्पादन, प्रक्रिया, मूल्य आधारित उद्योगांकरिता बँकांमार्फत मंजूर करण्यात आलेल्या रु.५.०० ते १०.०० लक्षपर्यंतच्या कर्ज रक्मेवरील १२% व्याजाच्या मर्यादेत व्याज परतावा उपलब्ध करून देण्यात येईल.

इतर मागास प्रवर्गातील किमान ५०% महिलांचा समावेश असलेल्या पात्र महिला बचतगटास प्रथम टप्प्यात रु.५.०० लक्ष पर्यंत कर्ज बँकेकडून उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात येईल. बँकेकडून मंजूर केलेल्या कर्ज रक्कमेवरील कमाल १२% व्याजाच्या मर्यादेत व्याज परतावा ओबीसी महामंडळामार्फत अदा करण्यात येईल.

### अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे

■ अर्जदारास सक्षम अधिकाऱ्याने निर्गमित केलेला इ.मा.व. जातीचा दाखला (OBC).
■ वयाचा पुरावा उदा. जन्म तारखेचा पुरावा/ शाळा सोडल्याचा दाखला.
■ रहिवासी दाखला (आधार कार्ड, लाईट बिल, व्होटर कार्ड इ.).
■ बचतगटाचे बँक पासबुक.
■ बचतगटातील महिला सदस्यांचे उचठउ कडून प्रमाणित कौटुंबिक उत्पन्नाबाबतचे प्रमाणपत्र अथवा स्वयं-घोषणापत्र.

### लाभार्थी पात्रतेच्या अटी व शर्ती –

■ अर्जदाराचे वय १८ ते ६० वर्षे असावे.
■ महिला बचतगटातील महिला इतर मागास प्रवर्गातील व महाराष्ट्राची रहिवासी असावी.
■ प्रथम टप्प्यातील कर्ज नियमित परतफेडीनंतर संबंधित बचतगट द्वितीय टप्प्यात रु.१०.०० लक्ष पर्यंत कर्ज बँकेकडून मंजूर करून घेण्यास पात्र होईल.

### कार्यपद्धती

ही योजना पूर्णपणे ऑनलाईन असून ज्या उमेदवारांना महिला स्वयंसिध्दी व्याज परतावा योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी आपले अर्ज महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळावर नोंद करणे आवश्यक आहे.

तरी इच्छुक, गरजू इ.मा.व. (ओ.बी.सी.) प्रवर्गातील व्यक्तींनी योजनांच्या अधिक माहितीकरिता शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ लि.चे जिल्हा कार्यालय डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, कळवा, ठाणे, २ रा मजला, दत्तवाडी स्वामी समर्थ मठासमोर, सह्याद्री शाळेच्या बाजूला, खारेगाव, कळवा ठाणे - ४००६०५ Email-dmobcthanegmail.com येथे संपर्क साधावा, तसेच अधिक माहितीसाठी www.msobcfdc.org या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन ठाणे जिल्हा व्यवस्थापक (अ.का.) निशिकांत नार्वेकर यांनी केले आहे.

**मनोज सुमन शिवाजी सानप**
जिल्हा माहिती अधिकारी
ठाणे

# कंगनाच्या 'इमर्जन्सी'चा मार्ग मोकळा, सेन्सॉरकडून यू/ए प्रमाणपत्र

अभिनेत्री कंगना राणौतचा 'इमर्जन्सी' चित्रपटाच्या प्रदर्शनाचा मार्ग मोकळा झाला आहे. सेन्सॉरने या चित्रपटाला हिरवा कंदील दाखवत 'U/A' प्रमाणपत्र दिले आहे. मात्र, चित्रपटामध्ये १० बदल आणि तीन दृश्यांना कात्री लावली आहे.

'इमर्जन्सी' हा चित्रपट ६ सप्टेंबर २०२४ रोजी प्रदर्शित होणार होता; परंतु, सेन्सॉरकडून प्रमाणपत्राअभावी तो प्रदर्शित होवू शकला नाही.८ जुलै रोजीच निर्मात्यांनी चित्रपट सेन्सॉर बोर्डाकडे प्रमाणपत्रासाठी सादर केला होता. मात्र एका महिन्यानंतर शिरोमणी अकाली दल आणि अनेक शीख संघटनांनी चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी सुरू केली होती. या परिस्थितीत सीबीएफसीने चित्रपटाच्या प्रॉडक्शन हाऊसला पत्राद्वारे तीन कट आणि त्यात सुमारे १० बदल करण्याची सूचना केली होती.

'इमर्जन्सी' चित्रपटात कंगना राणौत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या भूमिकेत दिसणार आहे. कंगनाने स्वतः या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. 'इमर्जन्सी' या चित्रपटामध्ये अनुपम खेर, श्रेयस तळपदे आणि महिमा चौधरीसारखे स्टार्सही महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. १९७५ ते १९७७ या २१ महिन्यांच्या कालावधीत देशावर लादलेल्या आणीबाणीचा काळ या चित्रपटात दाखवण्यात आला आहे. आता या चित्रपटाला सेन्सॉरकडून प्रमाणपत्र मिळाल्यानंतर लवकरच प्रदर्शनाची नवीन तारीख जाहीर केली जाईल अशी अपेक्षा आहे.

सेन्सॉर बोर्ड प्रादेशिक कार्यालय समितीने दिलेल्या अहवालानुसार 'U' प्रमाणपत्र असलेला चित्रपट हा सर्व वयोगटातील प्रेक्षकांसाठी असतो. तर 'U/A' प्रमाणपत्र मिळालेला चित्रपट पाहण्यासाठी १२ वर्षावरील मुलांना एखाद्या प्रौढ व्यक्तीच्या सोबतच हा चित्रपट पाहण्याची परवानगी असते.

# सबालेन्का 'यूएस ओपन'ची नवी क्वीन!

नवी दिल्ली: जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेली बेलारूसची टेनिसपटू आर्यना साबालेन्का हिने यूएस ओपनच्या महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले. चढ-उतारांनी भरलेल्या फायनलमध्ये साबलेन्काने अमेरिकेच्या जेसिका पेगुलाचा ७-५, ७-५ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. हा सामना एक तास ५३ मिनिटे चालला.

गेल्या वर्षी यूएस ओपनच्या फायनलमध्ये साबालेन्का अमेरिकन खेळाडू कोको गॉफकडून पराभूत झाली होती, मात्र यंदा तिने इतिहासाची पुनरावृत्ती होऊ दिली नाही. पहिल्यांदाच एखाद्या ग्रँडस्लॅमची अंतिम फेरी गाठणा-या पेगुलाने साबालेन्काला कडवी झुंज दिली पण त्यात तिला बाजी मारता आली नाही. साबालेन्काने पेगुलाचे आव्हान परतवून लावले आणि यूएस ओपनवर आपले नाव कोरले.

पेगुलाने चांगली सुरुवात केली. तिने पहिल्या सेटमध्ये साबालेन्कावर २-१ अशी आघाडी घेतली. पण त्यानंतर साबालेन्का हिने सर्व्हिस ब्रेक घेऊन खेळात पुनरागमन केले. तिने ५-२ अशी आघाडी घेतली. मात्र, पेगुलाने साबालेन्काला पहिला सेट सहजासहजी जिंकू दिला नाही आणि निर्णायक वेळी तिची सर्व्हिस ब्रेक करून स्कोअर ५-४ केला आणि नंतर ५-५ अशी बरोबरी साधली. स्कोअर लाइन ६-५ असताना, २६ वर्षीय सबालेन्काने दोन सेट पॉइंट गमावले. पण तिस-यांदा यात अपयश येऊ दिले नाही आणि पहिला सेट ७-५ ने जिंकला.

साबालेन्का दुसऱ्या सेटमध्ये अधिक प्रभावी दिसली आणि तिने सर्व्हिस ब्रेकसह ३-० अशी आघाडी घेतली. जेसिका पेगुलाने सर्व्ह राखून सेटमध्ये आपले खाते उघडले, परंतु ती पुनरागमन करण्यापासून आणि प्रतिस्पर्ध्यावर दबाव आणण्यापासून दूर होती. असे असले तरी पेगुला कोणत्याही प्रकारे पराभव स्वीकारण्यास तयार नव्हती. तिने पुन्हा एकदा साबालेन्काची सर्व्हिस ब्रेक केली. ज्यामुळे स्कोअरलाइन ३-३ अशी झाली. ती इथेच थांबली नाही आणि आणखी एक सर्व्हिस ब्रेक घेत तिने साबालेंकावर ५-३ अशी आघाडी घेतली. साबलेन्का कठीण परिस्थितीत सापडली. पण तिने स्वत:वर नियंत्रण ठेवले आणि लगेचच आपला खेळ सुधारला. यानंतर ती पुनरागमन करण्यात यशस्वी ठरली. तिने दुसरा सेट आणि सामनाही ७-५ असा जिंकला. साबालेन्का ६-५ वर असताना तिला दोन मॅच पॉईंट मिळाले, त्यापैकी एक पेगुलाने वाचवला. पण साबालेंकाने दुसरा गुण आपल्या नावे करत पहिल्यांदाच यूएस ओपनचे विजेतेपद पटकावले.

आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते झाले

# ठाणे पालिकेतर्फे फिरत्या विसर्जन व्यवस्थेचे लोकार्पण

ठाणे (गणेश भोईटे) : ठाणे महापालिका क्षेत्रात यंदा गणेश मूर्ती विसर्जन करण्यासाठी सहा फिरत्या विसर्जन व्यवस्थांची व्यवस्था करण्यात आली आहे. या महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या संकल्पनेतून ही व्यवस्था तयार झाली असून त्याचे लोकार्पण सौरभ राव यांच्या हस्ते महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले. विसर्जनाची व्यवस्था असलेला हा ट्रक ठरलेल्या वेळी वेगवेगळ्या ठिकाणी फिरणार आहे. त्या ट्रकवरील टाकीत गणेश मूर्तींचे विसर्जन करता येणार आहे. कृत्रिम तलाव, टाकी व्यवस्था याप्रमाणेच महापालिकेने यंदा फिरत्या विसर्जन व्यवस्थेचा प्रयोग केला आहे. सध्या चार प्रभाग समितींमध्ये वेळापत्रकानुसार हे ट्रक फिरणार आहेत. गणेश भक्तांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त राव यांनी लोकार्पण प्रसंगी केले.

कृत्रिम तलाव, टाकी व्यवस्था याप्रमाणेच महापालिकेने यंदा फिरत्या विसर्जन व्यवस्थेचा प्रयोग केला आहे. सध्या चार प्रभाग समितींमध्ये वेळापत्रकानुसार हे ट्रक फिरणार आहेत. गणेश भक्तांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त राव यांनी लोकार्पण प्रसंगी केले.
महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार ठाणे महापालिका क्षेत्रात बांधकाम विभाग, पर्यावरण विभाग आणि घनकचरा विभाग यांनी विसर्जन व्यवस्थेचे नियोजन केले आहे. त्यात, ०९ विसर्जन घाट, १५ कृत्रिम तलाव, १० मूर्ती स्वीकृती केंद्र आणि ४९ ठिकाणी टाकी विसर्जन व्यवस्था आणि सहा फिरत्या विसर्जन व्यवस्था यांचा समावेश आहे.
यावर्षी ही फिरती विसर्जन व्यवस्था नौपाडा-कोपरी, माजिवडा-मानपाडा, वागळे आणि वतर्कनगर या चार प्रभाग समिती क्षेत्रांमध्ये उपलब्ध असेल. सकाळी १२ ते रात्री १० वाजेपर्यंत प्रभाग समितीमधील विविध ठिकाणी ठराविक काळासाठी हे फिरते वाहन विसर्जन व्यवस्थेसह उपलब्ध राहील. त्यावरील टाकीमध्ये गणेश मूर्तींचे विसर्जन करता येईल. या विसर्जन व्यवस्थेचे वेळापत्रक ठाणे पालिकेच्या वेबसाईटवर, 'पर्यावरणपूरक गणपती विसर्जन व्यवस्था २०२४' या शीषर्कावर उपलब्ध उपलब्ध करण्यात आले आहे. , अशी माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी प्रधान यांनी दिली.

### टाकी व्यवस्था ४९ ठिकाणी

गेल्यावर्षीपासून महापालिकेने कृत्रिम तलावांच्या सोबतीने छोट्या टाक्यांचीही व्यवस्था विसर्जनासाठी केली होती. त्यानुसार, गेल्यावर्षी ४२ ठिकाणी टाक्यांची सुविधा उपलब्ध होती. ती संख्या यंदा ४९ एवढी करण्यात आली आहे.

### १० मूर्ती स्वीकृती केंद्रे

तसेच, जेल तलाव, मढवी हाऊस-राममारुती रोड, महागिरी कोळीवाडा, टेंभी नाका, रिजन्सी हाईट्स-आझादनगर, लोढा लक्झेरिया, कामगार हॉस्पिटल, किसन नगर बस स्टॉप, मॉडेला चेक नाका, देवदया नगर-शिवाई नगर या १० ठिकाणी मूर्ती स्वीकृती केंद्रे आहेत.

### १५ ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था

आंबेघोसाळे, मासुंदा दत्त घाट, खारीगाव, घोलाईनगर, दातिवली तलाव, खिडकाळी तलाव, न्यू शिवाजी नगर कळवा तलाव, निळकंठ वूड्स- टिकूजीनी वाडी, रेवाळे, बोरिवडे, ब्रम्हांड ऋतू पार्क, हिरानंदानी रायलादेवी-१, रायलादेवी-२, उपवन तलाव परिसर-वर्तकनगर, देवदयानगर अशा १५ ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे.

### ९ ठिकाणी विसर्जन घाट

त्याचबरोबर, कोपरी, पारसिक रेती बंदर, रेतीबंदर -१, रेतीबंदर-२-राणानगर, फास्ट ट्रॅक ब्रिज, बाबाजी पाटील वाडी, शंकर मंदिर घाट, कोलशेत, बाळकूम अशा ०९ ठिकाणी विसर्जन घाटांची व्यवस्था आहे.

# श्रीगणेशाची कृपादृष्टी सगळ्यांवर राहो!

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले महापालिका कर्मचाऱ्यांच्या गणेशाचे पूजन



ठाणे : श्रीगणेशाची कृपादृष्टी सगळ्यांवर राहो, श्रीगणेशाच्या कृपेने ठाणे महापालिकेची कीर्ती कायम वृद्धिंगत होवो, अशी प्रार्थना ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली. ठाणे महापालिका कर्मचारी गणेशोत्सव मंडळाच्या गणेश मूर्तीचे पूजन आयुक्त राव आणि त्यांच्या पत्नी प्रियांका राव यांनी केले. ठाणे महापालिका कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचे यंदाचे ४२वे वर्ष आहे. मंडळाचे अध्यक्ष असलेल्या महापालिका आयुक्त यांनी गणेशोत्सवाच्या सर्व ठाणेकरांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त मीनल पालांडे, परिवहन समितीचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर, मंडळाचे सचिव पी. एच. पाटील, कार्यवाह आर. के. पाटील आदी उपस्थित होते. कर्मचाऱ्यांच्यावतीने अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी आयुक्त सौरभ राव यांचा तर, उपायुक्त मीनल पालांडे यांनी प्रियांका राव यांचा सत्कार केला.

# आठव्या माळ्यावरून उडी घेऊन तरुणाची आत्महत्या

ठाणे : ठाण्याच्या वसंत लॉन्स या इमारतीच्या आठव्या माळ्यावरून उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी रात्री ८-३० वाजण्याच्या सुमारास घडली. आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव दीप सुरेश ठक्कर (२८) असून त्याला यूपीएससी परीक्षेत अपयश आल्याने नैराश्येतून त्याने आत्महत्या केल्याची सूत्राची माहिती आहे. या प्रकरणी वर्तकनगर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.
ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पिटल जवळील वसंत लॉन्स या इमारतीच्या आठव्या माळ्यावर आई वडीलांसह राहणारा दीप सुरेश ठक्कर (२८) हा यूपीएससीची परीक्षा उत्तीर्ण होऊ न शकल्याने तो नैराश्यात होता. यातूनच त्याने आत्महत्यासारखे टोकाचे पाऊल उचलले अशी माहिती पोलिसांनी दिली. दीपने शनिवारी रात्री साडे आठ वाजेच्या सुमारास आपल्या घराच्या आठव्या मजल्यावरून उडी घेतली. त्यानंतर त्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, परंतु उपचारापूर्वीच त्याचा मृत्य झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. मयत तरुणाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या प्रकरणी वर्तकनगर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. दरम्यान, मयत तरुणाने आत्महत्या करण्यापूर्वी लिहलेली एक सुसाईड नोट पोलिसांना मिळाली आहे. आई, पप्पा मला माफ करा. मी तुमच्या अपेक्षा पूर्ण करू शकलो नाही. अपयशामुळे वावरने कठीण झाले आहे. मी आई, बाबा आणि भाऊ यांच्यावर प्रेम करतो. माझ्या मृत्युला कोणीही जबाबदार नाही. असे या सुसाईड नोट मध्ये लिहले आहे अशी माहिती पोलिसांनी दिली.

खारघरच्या मेडिकवर रुग्णालयात केमोथेरपी घेणाऱ्यांना

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून मदत मिळणार

पनवेल: खारघर येथील मेडिकवर रुग्णालयात कर्करोगावरील केमोथेरपी करून आता त्याच दिवशी घरी जाता येणार आहे. शुक्रवारी दुपारी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या उपस्थितीत या वार्डाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी चिवटे यांनी या रुग्णालयात किमोथेरेपी घेणाऱ्या सर्व रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून ५० हजार रुपयांची आर्थिक मदत केली जाईल तसेच कर्करोगासंबंधीत शस्त्रक्रिया करणाऱ्या रुग्णांना १ लाख रुपयांची आर्थिक मदत करणार आणि अवयव प्रत्यारोपण सारख्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेसाठी मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून २ लाख रुपयांची मदत केली जाईल अशी घोषणा चिवटे यांनी केली.
कर्करोगाशी लढा देणाऱ्या रुग्णांसाठी तसेच केमोथेरपी घेत असलेल्या रुग्णांसाठी नवी मुंबईच्या खारघर येथील मेडिकवर रुग्णालयाने सुरक्षित आणि उत्तम दर्जाच्या सुविधा देण्यासाठी केमो डे केअर वॉर्ड सुरू केला असून या नवीन सुविधेमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली अत्याधुनिक उपकरणांच्या मदतीने एकाच वेळी १५ रुग्ण केमोथेरपी उपचार घेऊ शकतील. मेडिकवर रुग्णालयाकडून केवळ रोगावर उपचार करण्यासाठीच नव्हे तर,या आव्हानात्मक काळात रुग्णांना होणारा त्रास, त्यांची गैरसोय कमी करण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात असल्याचे रुग्णालयाचे केंद्र प्रमुख डॉ. माताप्रसाद गुप्ता यांनी सांगीतले.
कर्करोगाच्या रूग्णांना केमोथेरपीनंतर प्रकृती स्थिर झाल्यावर घरी परतणे हा प्रवास खूप त्रासदायक असल्याने रुग्णांना सर्वाधिक अशक्तपणा येतो. यासाठी रुग्णांना केमोथेरपीनंतर त्याच दिवशी घरी परतण्यासाठी केमो डे केअर वॉर्डचा अभिनव उपक्रम मेडीकवरने केला आहे.

# श्रीगणेशमूर्ती विसर्जनाचे सुव्यवस्थित नियोजन करीत नवी मुंबई पालिका सज्ज



नवी मुंबई : श्री गणेशोत्सव २०२४ 'इकोफ्रेंडली प्लास्टिकमुक्त' साजरा व्हावा असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले असून त्याला पर्यावरणप्रेमी नवी मुंबईकर नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे.
त्यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेने दीड दिवसाच्या श्रीगणेशमूर्ती विसर्जनापासूनच सर्व विसर्जनस्थळी सुयोग्य व्यवस्था केली असून नैसर्गिक २२ विसर्जन स्थळांव्यतिरिक्त विविध विभागांमध्ये १३६ कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात आलेली आहे. याद्वारे महत्त्वाचे म्हणजे जलप्रदूषणाला प्रतिबंध होऊन पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा व्हावा तसेच नागरिकांची एकाच ठिकाणी होणारी गर्दी विभागली जावी यादृष्टीने श्री गणेशमूर्ती विसर्जन स्थळांची संख्या मोठ्या प्रमाणात ठेवण्यात आली आहे.
श्रीगणेशोत्सवामध्ये मंडप उभारणीकरिता कोणत्याही प्रकारचे शुल्क न आकारण्याचा निर्णय आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी घेतला असल्याने १९९ गणेशोत्सव मंडळे रितसर परवानगी घेऊन उत्साहाने गणेशोत्सव साजरा करीत आहेत.
गणेशोत्सव मंडळांना मंडप उभारण्यासाठी परवानगी अर्ज करण्याची ऑनलाईन ई सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. त्याकरिता प्रत्येक विभाग कार्यालयात विशेष परवानगी कक्ष स्थापित करण्यात आला होता. त्यास अनुसरून १९९ गणेशोत्सव मंडळांना त्वरित विनासायास सहजपणे परवानगी प्राप्त झाली असून बेलापूर विभागात २८, नेरूळ विभागात २७, वाशी विभागात १८, तुर्भे विभागात १९, कोपरखैरणे विभागात ५३, घणसोली विभागात १०, ऐरोली विभागात ३१ आणि दिघा विभागात १३ अशाप्रकारे १९६ गणेशोत्सव मंडळांना परवानगी देण्यात आलेली आहे.

कोकण विभागीय शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या निधीतून

# १३३ डिजिटल शाळांना इ. प्लॅनिंग साहित्याचे वाटप



कळवा : कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार माननीय ज्ञानेश्वर म्हात्रे स्थानिक विकास (२०२४-२५) निधीतून ठाणे आणि भिवंडी तालुक्यातील एकूण १३३ शाळांना डिजिटल इ-लर्निंग इक्विपमेंट चे वाटप करण्यात आले.
ठाणे शहर आणि मीरा-भाईंदर विभागातील एकूण ८५ शाळांना डिजिटल ई लर्निंग इक्विपमेंटचे वाटप मनीषा विद्यालय कळवा येथे संपन्न झाले, याप्रसंगी ठाणे विभागाचे आमदार संजय केळकर, विधान परिषदेचे आमदार निरंजन डावखरे, मनीषा एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष प्रदीप साळवी, सचिव राहुल साळवी, शिवसेना संपर्कप्रमुख रविकांत पाटील, डॉक्टर सूर्यकांत उमरसकर, सचिन मोरे, प्रवीण पाटील, मधुकर भट, जगदीश भगत सर मंगेश पाटील सर मनिषा विद्यालयाचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर पाटील, चौधरी महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे सल्लागार गुलाब दवणे, ठाणे जिल्हासचिव मनोहर पाटकर सर, ठाणे उपाध्यक्ष प्रदीप पाटीलसर, खजिनदार सुनील जाधव, उपाध्यक्ष आवार, सोशल मीडिया प्रमुख अर्जुन चेमटे, सोमनाथ पतंगे, कैलास निकाळजे, महिला संघटक संध्या माळी, बनसोडे, बोटे, माधव दराडे, आशुतोष सिंग, उर्दू विभागाचे इम्रान फरीद, नावेद, वसुंधरा वायदंडे मॅडम, सिझा खोरात, मॅडम आणि अनेक शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.
तसेच दुपार सत्रात भिवंडी तालुक्यातील एकूण ४८ शाळांना डिजिटल ई लर्निंग इक्विपमेंटचे वाटप साफीया गर्ल्स उर्दू हायस्कूल भिवंडी येथे संपन्न झाले, याप्रसंगी महाराष्ट्र राज्य शिव छत्रपती शिक्षक संघटनेचे राज्य संपर्कप्रमुख विष्णू विशे, सल्लागार गुलाब दवणे, सल्लागार अस्लम खान, नौशाद पटेल, दिगंबर बेंडाळे, भिवंडी तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष भाई पाष्टे, भिवंडी विभाग अध्यक्ष रंजीत भोईर, मधुकर गायकवाड, क खंबायत, विनोद नाईक, गब्बर खान, अल हमशा एज्युकेशन सोसायटीचे सचिव वकार अहमद मोमीन, अन्सारी सापीयाच्या मुख्याध्यापिका अन्सारी, अलनूर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका कैसर ढोलेमॅडम आणि अनेक शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# खारफुटीवर भराव प्रकरणी गुन्हा दाखल

ठाणे : बाळकुम येथील मुंबई महापालिकेच्या जलवाहिनी लगत खारफुटीवर भराव टाकून खारफुटी नष्ट केल्याप्रकरणी कापुरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी कापूरबावडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाळकूम येथील जलवाहिनी लगत माती आणि राडारोड्याचा भराव टाकून खारफुटी नष्ट केली होती. याबाबत पर्यावरणवादी कार्यकर्त्यांना माहिती मिळाल्यानंतर तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनंतर कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण उपसमितीने ६ जूनला स्थळ पाहाणी केली. त्यावेळी सर्व्हे क्रमांक ३८ आणि ५९ येथील खारफुटींवर मोठ्याप्रमाणात भराव टाकून ती नष्ट केल्याचे आढळून आले. अखेर मंडळ अधिकाऱ्यांनी याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार अनोळखी व्यक्तीविरोधात पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ आणि १९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



*ठाणे महानगरपालिकेच्यावतीने आद्य क्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीच्या निमित्ताने, मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर आणि महापालिका कर्मचारी उपस्थित होते.*

# बोगस डॉक्टरवर पालिकेची कारवाई

वसई : वसई विरार शहरात पुन्हा एकदा बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट सुरू झाला आहे. नुकताच पालिकेच्या वैद्यकीय विभागाने वसई पूर्वेच्या भोयदापाडा येथील बेकायदेशीरपणे दवाखाना चालविणाऱ्या बोगस डॉक्टरवर कारवाई केली आहे. यावेळी डॉक्टर नसताना कर्मचाऱ्याकडून रुग्णांवर उपचार केले जात असल्याचे उघड झाले आहे.
वसई विरार शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. विविध ठिकाणी वाढते अनधिकृत बांधकामे व बैठ्या चाळी अशा दाटीवाटीच्या भागात बोगस डॉक्टर दवाखाने थाटू लागले आहेत. नुकताच सातीवली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय आरोग्य पथक तपासणीसाठी फिरत असताना वसई पूर्वेच्या भोयदापाडा राजावळी रस्त्यावर बालाजी क्लिनिक या नावाने कोणतीही परवानगी न घेता बोगस डॉक्टरद्वारे दवाखाना चालविला जात असल्याची माहिती मिळाली होती. शुक्रवारी दुपारी डॉ. श्रीनिवासराव धुधमल आणि पथक व पोलीस यांना सोबत घेऊन धाड टाकली. त्यावेळी डॉक्टर नसतानाही कामासाठी ठेवलेल्या कर्मचाऱ्यांकडून रुग्णाला इंजेक्शन देऊन उपचार केले जात असल्याचे उघड झाले आहे. रामचंद्र रामदूर यादव असे या कर्मचाऱ्याचे नाव असून कोणतीही वैद्यकीय डिग्री नसल्याचे निष्पन्न झाले आहे. दवाखान्याला डॉ. आरविंद कुमार यादव यांचा फलक लावून त्या ठिकाणी कर्मचारी रुग्णांना सेवा देत होता अशी माहिती पालिकेच्या वैद्यकीय विभागाने दिली आहे. दवाखान्यात इन्जेक्शन्स, आय. व्हि. सेट व इतर ॲलोपॅथी औषधे आढळून आली असून याप्रकरणी रामचंद्र यादव याच्या विरोधात वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.




'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१